ePaper

# शिवसेनेकडून बंडखोरांना नोटीस, 48 तासांत भूमिका मांडा अन्यथा...



| वर्ष - 6 | अंक - 80 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- माउलींची पालखी संत सोपानकाकांच्या नगरीत
- भाजपाप्रति समर्पण भावनेचा हा विजय : आमदार महेश लांडगे
- बंडखोर आमदारांना परत आणण्यासाठी शरद पवार मैदानात?


www.mahaenews.com | शनिवार | दिनांक 25 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



"शिवसेना ही कुटुंबाची खासगी मालमत्ता नाहीये, शिवसेना हा एक विचार आहे हा विचार भाजपा संपवायला निघाला आहे. त्यांचा हा डाव आहे. हिंदुत्वाच्या व्होट बँकेत त्यांना दुसरा भागीदार नको आहे. जो-जो हिंदुत्वाबाबत बोलेलं तो त्यांचा शत्रू आहे. जेव्हा महाराष्ट्राच्या आणि भारताच्या राजकारणात भाजपा-शिवसेनेला काहीच नव्हते, हिंदू म्हणून लोक एकमेकांना जवळ करायला तयार नव्हतं. तेव्हा हिंदू मतांची विभागणी होऊ नये.

**- उद्धव ठाकरे,** मुख्यमंत्री

ज्या पक्षाचे नाव घेऊन निवडून येतात आणि नंतर त्या पक्षालाच विसरतात ही प्रवृत्ती वेगाने वाढतेय आणि देशांमध्ये या वृत्तीला प्रस्थापित राज्यकर्ते खतपाणी घालतात हे दुर्दैव आहे. एखादा पक्ष अथवा संघटना उभी करताना काय करावे लागते याचा अनुभव आपण स्वाभिमानी संघटनेच्या स्थापनेतून घेतला आहे. आज उद्या भारतीय जनता पक्षासारख्या मोठ्या पक्षावर सुद्धा अशी वेळ आल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा वेळीच काळाची पावले ओळखावीत

**- राजू शेट्टी,** स्वाभिमानी शेतकरी संघटना नेते



### रस्त्यांवरील खांब, विद्युत यंत्रणेशी छेडछाड केल्यास जीवितास धोका होण्याची शक्यता

# शहरातील सर्व पथदिव्यांच्या खांबांची तपासणी

### नागरिकांनी खबरदारी बाळगण्याचे पिंपरी पालिकेचे आवाहन

**| पिंपरी | महाईन्यूज |**

शहरवासियांनी पथदिवे खांब व विद्युत यंत्रणेशी कोणत्याही प्रकारची छेडछाड करु नये, खांबाला तसेच फिडरपिलरला स्पर्श करु नये, पथदिवे खांबातून विनापरवाना वीज घेऊ नये, असे आवाहन पिंपरी पालिकेने केले आहे. अशा कृत्यामुळे जीवितास धोका होऊ शकतो तसेच जीवितहानी होण्याची शक्यता असल्याचे पालिकेचे प्रशासक तथा आयुक्त राजेश पाटील यांनी म्हटले असून सर्वांना खबरदारी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

पालिकेच्या वतीने शहरातील सर्व पथदिव्यांच्या खांबांची तपासणी करण्यात आली. विजेच्या खांबाचा झटका बसणे, गंजलेला व धोकादायक खांब, तुटलेला बॉक्स, फिडर पिलर आढळल्यास नागरिकांनी महापालिकेला कळवावे, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे. नागरिकांच्या सार्वजनिक सुरक्षिततेकरीता पालिका कार्यक्षेत्रातील इमारती, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावरील



प्रकाश व्यवस्थेकरीता दिवाबत्तीची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याची देखभाल व दुरुस्तीचे काम पालिकेमार्फत करण्यात येते. सध्या सर्व खांबांची तपासणी करण्यात आली आहे. धोकादायक परिस्थितीत एकही पोल आढळून येणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.

सुरक्षिततेबाबत महापालिकेने दिलेल्या सूचनांचे कटाक्षाने पालन करावे या कामांत काही उणीवा, त्रुटी अथवा असुरक्षिततासदृश्य परिस्थिती आढळल्यास नागरिकांनी ६७३३३३३३ तथा ८८८८००६६६६ या संपर्क दुरध्वनीवर कळवावे, असे विद्युत विभागाचे सह शहर अभियंता संदेश चव्हाण यांनी सांगितले. नागरिकांनी सुरक्षिततेबाबत महापालिकेने दिलेल्या सूचनांचे कटाक्षाने पालन करावे. जनावरे खांबांना बांधू नयेत, कपडे वाळत घालण्यासाठी खांबांना तारा बांधु नये, बांधकामामध्ये पथदिव्यांचे खांब घेऊ नये, खांबांना फलक लावू नये, कोणत्याही प्रकारची केबल अथवा तार खांबावरुन ओढु नये, असे आवाहन चव्हाण यांनी केले.

> नागरिकांच्या सार्वजनिक सुरक्षिततेकरीता पालिका कार्यक्षेत्रातील इमारती, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावरील प्रकाश व्यवस्थेकरीता दिवाबत्तीची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याची देखभाल व दुरुस्तीचे काम पालिकेमार्फत करण्यात येते.

### नगर, बीड, लातूर भागातीलबहुतांश आरोपी, पोलीस तपासात निष्पन्न

# तुकोबा आणि माऊलींच्या पालखीत चोऱ्या करणारे ६० आरोपी गजाआड

### चोरलेले साडेपाच लाखांचे सोन्याचे दागिने जप्त

**| पिंपरी | महाईन्यूज |**

तुकोबा आणि माऊलींच्या पालखीत चोऱ्या करणाऱ्या ६० आरोपींना पिंपरी-चिंचवड पोलिसांनी गजाआड केले आहे.पिंपरी: तुकोबा आणि माऊलींच्या पालखीत चोऱ्या करणाऱ्या ६० आरोपींना पिंपरी-चिंचवड पोलिसांनी गजाआड केले आहे. वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या या चोऱ्यांमध्ये आरोपींनी जवळपास साडेपाच लाखांचे सोन्याचे दागिने चोरले होते. पोलिसांनी ते जप्त केले आहेत. यातील बहुतांश आरोपी नगर, बीड, लातूर भागातील असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

पोलीस उपायुक्त काकासाहेब डोळे यांनी याबाबतची माहिती दिली. देहू आणि आळंदीतून प्रस्थान केलेल्या पालखीत चोऱ्या करण्यासाठी आलेल्या चोरांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची वेगवेगळी आठ पथके नियुक्त करण्यात आली होती. गर्दीचा फायदा घेऊन चोऱ्या करण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या २२५ संशयितांना ताब्यात घेण्यात आले होते.

> देहू आणि आळंदीतून प्रस्थान केलेल्या पालखीत चोऱ्या करण्यासाठी आलेल्या चोरांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची वेगवेगळी आठ पथके नियुक्त करण्यात आली होती. गर्दीचा फायदा घेऊन चोऱ्या करण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या २२५ संशयितांना ताब्यात घेण्यात आले होते. त्यातील ६० जणांना गजाआड टाकण्यात आले. मंगळसूत्र चोरणारे, पाकीटमार आदी स्वरूपातील गुन्हे त्यांनी केल्याचे निष्पन्न झाले.



## शॉर्ट न्यूज »

### यंदापासून पहिली ते बारावीसाठी संपूर्ण अभ्यासक्रम लागू

। पुणे । महाईन्यूज ।

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून इयत्ता पहिली ते बारावीसाठी संपूर्ण अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे. त्यामुळे परीक्षाही संपूर्ण अभ्यासक्रमानुसारच होणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

करोनाचा प्रादुर्भाव मार्च २०२० मध्ये सुरू झाल्यानंतर शाळा ऑनलाइन पद्धतीने सुरू होत्या. तर गेली दोन वर्षे प्रत्यक्ष शाळेत अध्ययन अध्यापन मर्यादित स्वरुपात होत होते. या परिस्थितीत विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचा ताण कमी होण्यासाठी २०२०-२१ मध्ये अभ्यासक्रम २५ टक्के कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. २०२१-२२ मध्येही करोना परिस्थिती कायम राहिल्याने कमी केलेला अभ्यासक्रम २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठीही तसाच ठेवण्यात आला होता. करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने यंदा शैक्षणिक वर्ष २०२२-२३ वमध्ये शाळा नियमित स्वरुपात सुरू झाल्या आहेत. त्यामुळे आता पहिली ते बारावीसाठी पूर्ववत शंभर टक्के अभ्यासक्रम लागू करण्यात आल्याचे शालेय शिक्षण विभागाने घेतला.

# मुख्यमंत्री म्हणून देवेंद्रजी येऊ दे !';

## भाजप पदाधिकाऱ्यांनी पालखी मार्गात उभारलेल्या फलकाची चर्चा




पुणे । विधानपरिषदेच्या निवडणुकीनंतर राज्यात वेगाने होत असलेल्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर 'मुख्यमंत्री म्हणून देवेंद्रजी येऊ दे !' असे फलक पालखी मार्गावर उभारत भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पांडुरंगाला साकडे घातले आहे. पंढरपूर येथील विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशीच्या सोहळ्यात विठ्ठलाची पूजा करण्याचा मान राज्याच्या मुख्यमंत्र्यांना आहे. मुख्यमंत्री सपत्निक विठ्ठलाची पूजा करतात. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या भोसरी तसेच शिवाजीनगर मतदारसंघातील स्थानिक पदाधिकाऱ्यांनी देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत, असे फलक पालखी मार्गावर उभारले आहेत. या फलकांची सध्या चर्चा सुरू आहे.

# पाणी समस्येचा तोडगा निघाला!

## धायरीकरांना मिळणार पूर्वीप्रमाणे पाणी



। पुणे । महाईन्यूज ।

शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिनीवरच थेट १२ इंचाची दुसरे जोडणी घेतल्याने डीएसके विश्व, बेनकर वस्ती, चव्हाण बाग, धायरेश्वर मंदिर, धायरी गावठाण, लायगुडे वस्ती, पोकळे वस्ती, रायकर मळा, जाधव नगर या धायरी आणि आसपासच्या परिसरातील पाणीटंचाईची समस्या निकाली निघाली असून भविष्यात पाणी टंचाई होण्याची शक्यता कमी आहे, अशी माहिती पाणी पुरवठा विभागाचे कनिष्ठ अभियंता व्यंकटेश पाटील यांनी दिली.

सिंहगड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत असणाऱ्या धायरी भागात दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील पाण्याच्या प्रश्नांमुळे धायरीकर हैराण झाले होते. प्रशासनाकडे विनंती पत्रे, तक्रारी करून देखील प्रशासन पाण्याचे योग्य नियोजन केले जात नाही, असा आरोप स्थानिकांनी प्रशासनावर केला होता. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने धायरीकरांसाठी तातडीने पाऊले उचलताना समस्या मार्गी लावली.

साधारण मे महिन्याची शेवट आणि जून महिन्यात खडकवासला धरणातील पाणी पातळी खाली जाते. जोपर्यंत धरणात पर्याप्त पाणीसाठा आहे, तोपर्यंत पाणी पुरवठा सुरळीत रहातो. मात्र, पाणी पुरवठा करणारी ३००० ही जलवाहिनीच्या खाली पाणीसाठा गेल्याने या भागात पाण्याची टंचाई निर्माण होत असते.

यावर उपाय म्हणून २५०० या जलवाहिनीवर नवीन १२ इंचाची नवीन जोडणी करून थेट या भागाच्या मुख्य विहिरीत जलवाहिनी जोड दिला आहे. यामुळे धारण क्षेत्रात पाणी कमी झाले तरी या भागाला पाण्याची समस्या उद्भविणार नाही.

# माउलींची पालखी संत सोपानकाकांच्या नगरीत

## दिवे घाटातील अवघड टप्पा लीलया पार, पालखी सोहळ्याने सासवडला जाण्यासाठी ठेवले प्रस्थान

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

टाळ मृदंगाच्या तालावर 'ज्ञानोबा माउली..तुकाराम... ..'असा जयघोष करीत अवघड दिवेघाट पार करून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहळ्याचे शुक्रवारी रात्री आठ वाजता सोपानकाकांच्या सासवड नगरीत दोन दिवसांच्या मुक्कामासाठी आगमन झाले. पुण्यामध्ये पहाटे माऊलींची नित्यपूजा व आरती झाल्यानंतर सकाळी सहा वाजता पालखी सोहळ्याने सासवडला जाण्यासाठी प्रस्थान ठेवले.

पुणे ते सासवड हा ३० किलोमीटरचा टप्पा मोठा असल्याने पालखी सोहळा वेगात पुढे चालत होता. सकाळी हडपसर येथे पालखी सोहळा पोहोचला, या वेळी हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. वाटेत ठिकठिकाणी वारकऱ्यांना फराळाचे पदार्थ वाटण्यात आले. पुणे ते दिवे घाटापर्यंत पालखी सोहळ्यात मोठ्या संख्येने पुणेकर सहभागी झाले होते. माऊलींचा हा सोहळा दुपारी दोन वाजता वडकीनाला येथे पोहोचला. तेथे वारकऱ्यांनी दुपारचा फराळ व विश्रांती घेतली. विश्रांतीनंतर दुपारी ३.३० वाजता पालखी सोहळ्याने अवघड दिवे घाट चढण्यास सुरुवात केली.

वैष्णवां संगती सुख<br>
वाटे जीवा<br>
आणिक मी देवा<br>
काही नेणी ॥<br>
गाये नाचे उडे आपुलिया छंदे<br>
मनाच्या आनंदे आवडीने ॥

दिवे घाट चढणे अवघड असल्याने माऊलींच्या रथाला




वडकी, फुरसुंगी येथील दोन बैलजोड्या जोडण्यात आल्या. विठ्ठल नामाचा गजर, टाळ मृदंगाचा आवाज अशा भारावलेल्या वातावरणात वैष्णवांनी दिवेघाट चढण्यास सुरुवात केली. अनेक दिंड्यांमध्ये टाळ-मृदंगाच्या तालावर निरनिराळे अभंग-गीते गायली जात होती, त्यामुळे साऱ्यांचाच उत्साह द्विगुणित होत होता. या वेळी बारामती विभागाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी वैष्णवांसमवेत घाट चढण्याचा आनंद लुटला. ढगाळ वातावरण असल्याने हवेत गारवा होता. उन्हाचा त्रास जाणवला नाही. करोनाच्या प्रादुर्भावामुळे दोन वर्षे वारी घडली नव्हती, त्यामुळे वारी अनुभवायला मिळाल्याचे समाधान वैष्णवांच्या चेहऱ्यावर होते. दिवे घाट हिरवाईने नटलेला आहे. घाटातील डोंगरावर उभ्या केलेल्या भव्य विठुरायाच्या मूर्तीकडे पाहून वैष्णवांच्या आनंदाला उधाण आले. घाट माथ्यावर हजारो भाविकांनी पालखी सोहळा पाहण्यासाठी गर्दी केली होती.

भाग गेला शीण गेला,<br>
अवघा झाला आनंद ॥

सात किलोमीटरचा दिवे घाट पार करून अश्वांसह माउलींचा सोहळा सायंकाळी पाच वाजता झेंडेवाडी येथे पोहोचला. या वेळी पुरंदर तालुक्यात पालखी सोहळ्याने प्रवेश करताना सुप्रिया सुळे, आमदार संजय जगताप, प्रांताधिकारी प्रमोद गायकवाड, तहसीलदार रूपाली सरनोबत, गटविकास अधिकारी अमर माने, विजय कोलते, बाबाराजे जाधवराव, जि.प सदस्य दिलीप यादव यांनी पालखी सोहळ्याचे स्वागत केले.

## शॉर्ट न्यूज

### MPSC मार्फत २८ वर्षांनंतर पहिल्यांदाच होणार 'सब रजिस्ट्रार'ची भरती

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने दुय्यम सेवा अराजपत्रित गट ब साठी संयुक्त पूर्व परीक्षा येत्या ८ ऑक्टोबरला घेण्यात येणार आहे. या परीक्षेची जाहिरात आज प्रसिद्ध करण्यात आल्याने स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. विशेष म्हणजे आयोगाच्या माध्यमातून १९९४ नंतर पहिल्यांदाच दुय्यम निबंधक या पदाची भरती केली जाणार आहे.सब रजिस्ट्रार या संवर्गाची ७८ पदे भरली जाणार आहेत. या परीक्षेच्या माध्यमातून सहाय्यक कक्ष अधिकारी या पदाच्या ४२ जागा राज्य कर निरीक्षक पदाच्या ७७ तर पोलीस उपनिरीक्षक पदाच्या ६०३ जागा भरल्या जाणार आहेत. परीक्षेसाठी राज्यातून लाखो विद्यार्थी बसत असतात. १५ जून ते १५ जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांना 'ऑनलाइन' पद्धतीने अर्ज करता येणार आहेत. संयुक्त पूर्व परीक्षेसाठी २०२० मध्ये ८०७ जागा, २०२१ मध्ये एक हजार 85 जागांसाठी जाहिरात काढण्यात आली होती. यावर्षी पदांची संख्या यापेक्षा जास्त असावी, अशी परीक्षार्थी विद्यार्थ्यांची अपेक्षा होती.

### नवनिर्वाचित आमदार उमा खापरे यांचे जल्लोषात स्वागत

# भाजपाप्रति समर्पण भावनेचा हा विजय : आ. महेश लांडगे

### आमदार जगताप यांच्यासारख्या निष्ठावंतांमुळे भाजपाला यश



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राष्ट्र प्रथम... नंतर पक्ष आणि शेवटी आपण... या भावनेतून काम करणाऱ्या भाजपाच्या अनेक कार्यकर्त्यांसाठी उमाताई खापरे यांचा विजय प्रेरणादायी आहे. आमदार लक्ष्मण जगताप यांनी आजारी असतानासुद्धा राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीत मतदान करुन पक्षनिष्ठेचा आदर्श घालून दिला, हीच भाजपाची खरी ताकद आहे, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.

विधान परिषद निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर आमदार उमा खापरे यांचे पिंपरी-चिंचवड शहरात आगमन झाले. भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्यांची भक्ती-शक्ती चौक ते मोरवाडी येथील पक्षकार्यालय पर्यंत भव्य रॅली काढण्यात आली. तसेच, विजयोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, माजी राज्यसभा खासदार अमर साबळे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, प्रदेश सचिव अमित गोरखे, माजी सत्तारुढ पक्षनेते एकनाथ पवार, नामदेव ढाके, माजी महापौर केशव घोळवे, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, राजू दुर्गे, विजय फुगे, प्रदेश निमंत्रित सदस्य संतोष कलाटे, दक्षिण भारतीय आघाडीचे प्रदेश प्रमुख राजेश पिल्ले, महिला शहराध्यक्षा उज्ज्वला गावडे, युवा मोर्चा शहराध्यक्ष संकेत चोंधे, भाजपा महिला मोर्चा कोषाध्यक्षा शैलजा मोळक, माउली थोरात, वैशाली खाडे, रेखा कडाली, आशा काळे, शोभा भराडे, कैलास सानप, प्रदीप बेंद्रे, राणी कौर, तेजस्विनी कदम यांच्यासह सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्व. गोपिनाथ मुंडेंच्या छोट्या कार्यकर्तीला संधी मिळाली : उमा खापरे

दरम्यान, आमदार उमा खापरे यांनी शहरात आल्यानंतर आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी खापरे यांचे जगताप कुटुंबियांकडून औक्षण करण्यात आले. आमदार जगताप आणि मुक्ता टिळक यांनी आजारी असतानाही मतदान केले. स्व. गोपिनाथ मुंडे यांची छोटी कार्यकर्ती म्हणून आज त्यांची खूप आठवण येत आहे. संघटनेत काम करीत असताना प्रत्येक कार्यकर्त्याला अपेक्षा असतात. गेली २५ वर्षे पक्षासाठी केलेल्या कामाची पोहोचपावती मिळाली. आमदार जगताप आणि लांडगे यांच्यासोबत त्यांची भगिनी म्हणून मी आगामी काळात काम करीन, असा विश्वास नवनिर्वाचित आमदार उमा खापरे यांनी व्यक्त केला.



### उमा खापरे यांच्या रुपाने पिंपरी-चिंचवडला मिळाल्या पहिल्या महिला आमदार

आमदार लांडगे म्हणाले की, राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीत मतदान करण्यासाठी आमदार लक्ष्मण जगताप आग्रह करुन आले. त्यांच्या पक्षनिष्ठेबाबत राज्यभरात चर्चा झाली. उमा खापरे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून भाजपाचे काम केले. त्यांना पक्षनिष्ठेचे फळ मिळाले. हा विजय आणि संधी भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्यासाठी मार्गदर्शक आहे. प्रामाणिकपणे काम केल्या पक्षनेतृत्व संधी देते ही बाब लक्षात घेतली पाहिजे. तसेच, उमा खापरे यांच्या रुपाने पिंपरी-चिंचवडला पहिल्या महिला आमदार मिळाल्या. त्यासाठी राज्याचे नेते देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील आणि सर्व पक्षश्रेष्ठींचे आभार मानतो, असेही आमदार लांडगे म्हणाले.

# स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा उत्साहात

### संत तुकाराम नगर येथील सोहम सार्वजनिक ग्रंथालयाचा पुढाकार



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

संत तुकाराम नगर येथील सोहम ग्रंथालयातर्फे स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यूपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या तन्मयी देसाई, तहसीलदार पदी निवड झालेल्या तमन्ना शेख यांचा संत तुकाराम नगर येथील सोहम ग्रंथालय व अभ्यासिकेत हा सत्कार करण्यात आला. जेष्ठ पत्रकार विवेक इनामदार यांचे हस्ते हा सत्कार करण्यात आला.

संत तुकारामनगर पिंपरी येथील सोहम सार्वजनिक ग्रंथालय 35 वर्षापासून पिंपरी चिंचवड भागात कार्यरत आहे. ग्रंथालयाची स्वतंत्र आभ्यासिका आहे. ग्रंथालयातुन आजपर्यंत अनेक विध्यार्थी प्रशासकीय सेवेत निवडले गेले आहेत. दर वर्षी वेगवेगळे उपक्रम राबिवले जातात. यावर्षी स्पर्धा परीक्षा तसेच 10 वी व 12 वी मध्ये उत्कृष्ट गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. १२ वी उत्तीर्ण झालेल्या कौसर शेख, तन्मय निकम यांचा तसेच १० वी उत्तीर्ण झालेल्या वैष्णवी शिंदे, साक्षी बनसोडे, आरती नलवडे, मानसी वर्मा, आशा चौहान यांचाही उत्कृष्ट यश संपादन केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात सूत्रसंचालन करून लोकांची मने जिंकणाऱ्या गौरव चौधरी यांचाही सन्मान करण्यात आला.

या वेळी आयएएस झालेल्या तन्मयी देसाई यांनी स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना पडलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. तहसीलदारपदी निवड झालेल्या तमन्ना शेख यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षेचे विद्यार्थी व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

### कार्यक्रमाला यांची होती उपस्थिती...

सोहम सार्वजनिक ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथ नेरकर यांनी प्रास्ताविक केले. या वेळी ज्येष्ठ पत्रकार विवेक इनामदार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. माजी नगरसेविका सुजाता पालांडे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, खत्री, किरण सुवर्णा शेठ, अभिजित गोफण, नंदू कदम, सुमन नेरकर आदी या वेळी उपस्थित होते. गौरव चौधरी यांनी सूत्र संचालन केले. संस्थेचे सचिव प्रदीप बोरसे यांनी आभार मानले.

## संपादकीय »

# एकनाथांच्या पारड्यात आकडे !

***शिवसेना पक्षप्रमुख आणि राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काल दिवसभर आसामला गेलेले आमदार परत आणण्यासाठी फारसे प्रयत्न न करता फेसबुक वरून जनतेशी संवाद साधण्याचा जो स्वस्त पर्याय निवडला त्यातून उद्धव माणूस म्हणून कसे छान छान आहेत हे लोकांना भावले तरी राजकीय नेता म्हणून त्यांच्या मर्यादा उघड्या पडल्या आहेत.***

लोकांना भावनिक आवाहन करून त्यांची मने जिंकता येतात मात्र परत गेलेले आमदार आणायचे असतील तर राजकीय मुत्सद्देगिरी दाखवावी लागते ,अशा आणीबाणीच्या प्रसंगात जे आवश्यक ते सगळे करावे लागते याचा ठाकरे यांना विसर पडल्याचे दिसून आले. जे आमदार शिंदे यांच्या कळपात सामील झाले त्यांना एखादा फोन करण्याचे सौजन्यही या छान छान नेत्याने दाखवले नाही. उद्धव ठाकरे यांनी फेसबुकवर भावनिक आवाहन केल्यावर आता लोकांना प्रेमाचा पाझर फुटेल असे वाटत असताना त्यांच्या विश्वासू वर्तुळातील पाच आमदार शिंदेंना जाऊन सामील होतात याचा कोणता अर्थ घ्यायचा ? जी भाषा ठाकरे यांनी लोकांशी संवाद साधताना वापरली त्याचा अवलंब त्यांनी गेल्या अडीच वर्षात आपल्या आमदाराला समजून घेण्यात केला असता तर कदाचित ही वेळ आली नसती. औरंगाबाद मधील आ.संजय सिरसाट यांनी उद्धव ठाकरे यांना गुवाहाटी वरून लिहिलेले पत्र पुरेसे बोलके आणि सेनेच्या सर्व आमदारांच्या भावना मांडणारे आहे. चार,पाच जनतेतून निवडून येणाऱ्या आमदारांना मातोश्रीवर तीनचार तास प्रतीक्षा करूनही आपल्या नेत्याची भेट मिळत नाही,परत जावे लागते,जाताना हा आमदार काय विचार करीत असावा हे समजून घेतले गेले नाही. आताच्या घडीला एकनाथ शिंदे यांच्याकडे सर्वाधिक आमदार जमा झाले आहेत.त्यांनी 50 लोकांचा दावा केला आहे.सेनेत अधिकृत फूट पडण्यासाठी आवश्यक असणारा आकडा सध्या शिंदे यांच्याकडे जमा झाला आहे. खुद्द शिंदे यांच्यासह सगळे आमदार उद्धव ठाकरे यांच्यावर थेट काही बोलत नसले तरी पक्षप्रमुख नेता म्हणून अपयशी ठरले आहेत असाच त्याचा अर्थ आहे.ज्यांना वेळ मागूनही मिळत नव्हती त्यांना आता मुंबईत बोलवावे लागत आहे,या आणि समोर बोला,मी पद सोडायला तयार आहे ही पडती भूमिका घेण्याची वेळ ठाकरे यांच्या कार्यशैलीमुळे आली आहे .संजय सिरसाट यांनी ज्या बडव्यांचा उल्लेख पत्रात केला आहे ,ते बडवे आता सेना संकटात असताना काय करीत आहेत हेही उघडे पडले आहे. मूळ मुद्दा आहे लाखो जनतेतून निवडून आलेल्या लोकांच्या सन्मानाचा,तोच ठाकरे विसरले आहेत.सेनेत आधी बाळासाहेब ठाकरे वयाने मोठ्या नेत्यांचा एकेरी उल्लेख करीत होते मात्र त्याचे कुणाला वाईट वाटत नव्हते कारण बाळासाहेब त्या उंचीचे नेते होते.

## आनंदी सकाळ

# चैतन्याशिवाय माणसाचा देह मातीमोलच...

जीवात्मा, अंतरात्मा, परमात्मा, विश्वात्मा असे चार प्रकार आहेत. देहबुद्धीचा पगडा ज्याच्यावर आहे, तो जीवात्मा. हा देहाबरोबर नष्ट होतो. आपण नेहमी असे म्हणतो, की माणसाला दोन मने असतात. त्यापैकी एक दृश्य वस्तूंशी संलग्न असून बहिर्मुख असते. लोकांत काय चांगले दिसेल व काय वाईट, याचा विचार करून ते निर्णय घेते. हा तो जीवात्मा. दुसरे मन फक्त तुमचे हित कशात आहे ते पाहूनच निर्णय घेते. तो अंतरात्मा. या अंतरात्म्याच्या अनुसंधानातच आपण राहिले पाहिजे; जेणेकरून आपली जाणीव विरल होत जाऊन त्या विश्वात्म्याशी, विश्वाच्या चालक शक्तीशी आपले अनुसंधान राहते. 'मी' आहे, ही जाणीव मला आहे, माझ्या मुलीला आहे, माझ्या आईलाही आहे. 'मी' आहे, ही जाणीव माणसाच्या जन्मापासून आहे. देह बदलतील; पण जाणीव असतेच. या अर्थाने ती अमर आहे. जळणे, तुटणे, फुटणे इत्यादी विकार देहाला होतात; जाणिवेला नाही. ती सूक्ष्म आहे. ती आहे हे आपल्याला कळते; कारण तिच्या अस्तित्वामुळेच आपल्याला 'मी'चे भान असते.

# साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी, बोलविता धनी वेगळाचि.'





## भूमिका

'दूरदर्शन'वर पौराणिक मालिका चालत, तेव्हा त्यातील युद्धांची दृष्ये बहारीची असत. दोन्ही योद्धे कितीही दूर असले, तरी त्यांनी एकमेकांवर सोडलेली वायव्यास्त्रे, पर्जन्यास्त्रे, आग्नेयास्त्रे बरोबर मध्यभागी भेटून निष्प्रभ होत. म्हणजे, एकाने अग्नीचे लोळ सोडले, तर दुसऱ्याने त्यावर पाणी टाकायचे किंवा गरगरत येणाऱ्या गदा अंतराळात चिंध्या करून उडवून द्यायच्या. शेवटचे ब्रह्मास्त्र मात्र नेमका वेध घ्यायचे. तशी सध्या मुंबई आणि गुवाहाटी यांच्यात विविध अस्त्रे सोडली जात आहेत. आता 'वर्षा'वेध घेणारे ब्रह्मास्त्र गुवाहाटीतून सुटते का आणि ते अंतिम घाव घालणारे ठरते का, हे समजायला फार वेळ उरलेला नाही. हा मधला अस्थिर काळ मात्र सगळ्यांच राजकीय पक्षांची परीक्षा पाहणारा आहे. गुवाहाटीतील शिवसेना आमदारांनीही आंतरराष्ट्रीय योग दिनी 'संयमासन' शिकून घेतले असेल. त्यांना वेगवेगळी आसने शिकवायला अनुभवी शिक्षकांची कमतरता नाही. या सगळ्या धुमश्चक्रीत दिल्ली आणि राज्यातला भारतीय जनता पक्ष एकदमच 'मौनासना'त शिरला आहे. एरवी सकाळी सूर्य उगवला, की लगेच 'कमळा'तून बाहेर पडून प्रत्येक पडद्यावर भुण भुण करणारे भुंगे गेले काही दिवस एक तर 'मौनरागा'त गेले आहेत किंवा त्यांना तसे एकांतात पाठवले गेलेले दिसते. कमलदळाला 'शेवटचे घरटे माझे तुझ्या अंगणात...' म्हणणारे एक माजी मुख्यमंत्री वाट्टेल ती तलवारबाजी करीत असतात. त्यांनाही सध्या मौनाची नागपुरी मात्रा चाटवलेली दिसते.


भाजपतील या मौनाचा अर्थ 'शांत बसा आणि गंमत बघा' असा आहे. तो अर्थातच ज्यांना पक्षाने काही विशेष काम दिलेले नाही, त्यांच्यासाठी आहे. याशिवाय, जे प्रचंड उपद्व्याप करून महाविकास आघाडीचे सरकार घालविण्यासाठी अहोरात्र परिश्रम करीत आहेत, ते अतिश्रमाने शांत आहेत. दुसरे म्हणजे, मौन मोडल्यास हातातोंडाशी आलेला घास बोलण्याच्या नादात खाली पडायला नको, ही काळजीही आहे. तिसरे म्हणजे, सध्या टाकलेला फास पुरता आवळला जात नाही, तोवर विजयाच्या आरोळ्या ठोकण्यात काही अर्थ नाही, एवढी समज अनेकांना आलेली दिसते. ज्यांना अशी समज येत नाही, त्यांना ती देण्याची यंत्रणा सुसज्ज आहे.

# राजकारण म्हणजेच बदमाशांचा शेवटचा अड्डा ?

**वसंतदादा पाटील यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याचे सरकार पवारांनी पाडले होते. नारायण राणे यांनी शिवसेनेतून बंडखोरी केली होती तेव्हा १० आमदारांनी शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' केला होता.**

१९९९ साली सोनिया गांधींच्या परदेशी मुळाच्या विषयावरुन शरद पवारांनी काँग्रेस सोडली आणि राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. २००५ मध्ये ठाकरे कुटुंबातीलच राज ठाकरे यांनी शिवसेना सोडली आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केली. २००४ मध्ये भास्कर जाधव यांनी शिवसेना सोडली होती.

राजकारणात छोटे-मोठे चमत्कार होत असतात, याचा महाराष्ट्राला पूर्वानुभव आहे. मात्र, एकाच वेळी तब्बल ५० आमदार घेऊन एखादा मंत्री वेगवेगळी राज्य फिरतो. विशेषत: शिवसेनेसारख्या एकाच पक्षाचे तब्बल ७७ टक्के आमदार पक्षाच्या नेतृत्वाला सोडून अन्यत्र निघून जातात, यावर विश्वास ठेवणे सर्वसामान्यांना अवघड जात आहे. म्हणूनच सध्या राजकारणात जे घडत आहे त्यावर किती टक्के सर्वसामान्यांचा विश्वास आहे हे बघणेही गरजेचे आहे. ज्यांचा राजकारणाशी काडीमात्र संबंध नाही अशा नागरिकांनाही सध्याचे राजकारण 'स्क्रिप्टेड' वाटावे. त्यांचा हा समज वास्तववादी आहे की



राजकारणाकडे पाहण्याची भोळी दृष्टी यावर चर्वितचर्वण करण्यापेक्षा त्यांना असे का वाटत असावे हेदेखील समजून घेणे गरजेचे आहे. पवारांनी महाराष्ट्रात काँग्रेसमधून बाहेर पडून विरोधकांची मोट बांधत मुख्यमंत्रीपद मिळवले होते. याला पुरोगामी लोकशाही दल अर्थात पुलोदचा प्रयोग म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात ओळखले गेले. पुलोदची स्थापना करून शरद पवारांनी राज्यातले पहिले आघाडी सरकार स्थापन केले होते.

राष्ट्रवादीचे सुनील तटकरे, उदय सामंत यांच्याशी वितुष्ट निर्माण झाल्यामुळे जाधव यांनी पुन्हा शिवसेनेत प्रवेश केला. गणेश नाईकांनी २०१४ च्या सुमारास पुत्र आणि माजी खासदार संजीव नाईक यांच्यासह ४८ नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. संजय निरुपम, बाळा नांदगावकर, सुरेश प्रभू, कालिदास कोळंबकर आदी पक्ष सोडून अन्यत्र गेलेल्यांची यादी लांबलचक आहे. त्यामुळे महाराष्ट्राला बंडाळीचा अनुभव नवा नाही, असे म्हणता येणार नाही. बंडखोरीचा इतका दांडगा अनुभव पाठीशी असतानाही सद्य:स्थितीत महाराष्ट्रात जे काही होत आहे त्यावर विश्वास ठेवायला सर्वसामान्य तयार नाहीत. त्याचे कारण म्हणजे सध्या ज्या वेगवान पद्धतीने घडामोडी घडत आहेत त्या चित्रपटाला शोभेशा आहेत. अन्य पक्षाच्या बाबतीत असे काही घडले असते तर कदाचित त्यावर विश्वासही बसला असता. परंतु जेथे हिंदुत्व, भगवे रक्त अशा भावनिक बंधांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना बांधून ठेवलेले असते तेथे हे बंध सहजपणे सुटणे शक्य नसते.

विशेषत: शिवसेनेत बाळासाहेब ठाकरे यांच्यासारख्या दरारा असलेल्या नेत्याने ज्यांच्यावर संस्कार रुजवले ते शिवसैनिक बाळासाहेबांच्या पुत्राविरोधात असे बंड कसे करू शकतात?

## ।। अभंगवाणी ।।



त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा ।
कठिण हें जिवा तोंचिवरी ।।१।।
मागिलांचे दुःख लागों नेदी अंगा ।
अंतर हें संगा नेदी पुढें ।।२।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### राज्यात ४,२०५ नवे रूग्ण

। मुंबई। महाईन्यूज ।

मागील काही दिवसांपासून कोरोनाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. गेल्या चोवीस तासांत राज्यात 4 हजार 205 नव्या कोरोना (CORONA NEWS) रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. तर, 3,752 जणांनी कोरोनावर मात केली आहे. दिलासादायक बाब म्हणजे गेल्या काही दिवसांपासून मुंबईत कोरोनामुक्तांपेक्षा बाधितांची संख्या अधिक नोंदवली जात होता. मात्र, गेल्या २४ तासांत मुंबईत नव्या 1,898 कोरोना बाधितांची नोंद करण्यात आली असून, 2253 जणांनी कोरोनावर मात केली आहे.

राज्यात आज तीन जणांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. त्यामुळे राज्यातील मृत्यूदर 1.85 टक्क्यांवर नोंदवण्यात आला आहे. तर, राज्यातील रूग्ण बरे होण्याचा दर 97.82 टक्के एवढा झाला आहे. सध्या राज्यात 25 हजारांहून अधिक सक्रिय रूग्णांवर उपचार केले जात आहेत. मुंबईमध्ये गेल्या काही दिवसांपासून कोरोनामुक्तांपेक्षा बाधितांची संख्या अधिक होती. मात्र, आज मुंबईत बाधितांपेक्षा कोरोनामुक्तांची संख्या अधिक आहे. त्यामुळे प्रशासनासह नागरिकांना काहिसा दिलासा मिळाला आहे.

मुंबईतील रूग्ण बरे होण्याच्या दरामध्येदेखील वाढ नोंदवण्यात

# बंडखोर आमदारांना परत आणण्यासाठी शरद पवार मैदानात?

## शरद पवार आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यात दोन तास चर्चा

।मुंबई ।महाईन्यूज ।

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यात सुरू असलेली बैठक नुकतीच पार पडली आहे. मागील दोन तासांपासून ठाकरे आणि पवार यांच्यात चर्चा झाली. या चर्चेला उपमुख्यमंत्री अजित पवार, जयंत पाटील, प्रफुल्ल पटेल आणि शिवसेना खासदार संजय राऊत देखील उपस्थित होते. शरद पवार साडेसहा वाजता मातोश्रीवर दाखल झाले होते. ८ वाजून २० मिनिटांनी ते मातोश्रीतून बाहेर पडले आहेत. त्यांच्यात जवळपास दोन तास चर्चा झाली.



खरंतर, कालपासून शरद पवार यांनी बंडखोर आमदारांविरोधात आक्रमक भूमिका घ्यायला सुरुवात केली आहे. दुसरीकडे, उद्धव ठाकरे यांनी देखील 'शिवसेना' आणि 'ठाकरे' नावाचा वापर न करता जगून दाखवा, असं आवाहन केलं आहे. त्यामुळे दोन्ही नेत्यांकडून आक्रमक भूमिका घेतल्याने पुढे काय घडणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

महाविकास आघाडी सरकार स्थापन होण्यापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सरकार स्थापन केलं होतं. पण शरद पवार यांनी राष्ट्रवादीच्या आमदारांचं बंड मोडून काढलं होतं. त्यानंतर आता गुरुवारपासून शरद पवारांनी शिवसेनच्या बंडखोर आमदारांविरोधात आक्रमक भूमिका घ्यायला सुरुवात केली आहे. त्यामुळे बंडखोर आमदारांना परत आणण्यासाठी शरद पवार मैदानात उतरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. दुसरीकडे, आज सकाळी शरद पवार आणि संजय राऊत यांच्यात झालेल्या बैठकीनंतर राऊत माध्यमांशी बोलताना म्हणाले की, "हम हार माननेवाले नही है! विधानसभेत मतदान झालं तर तिथे जिंकू, लढाई रस्त्यावर झाली तर तिथेही जिंकू, ज्यांना आमचा सामना करायचा आहे, त्यांनी मुंबईत येऊन सामना करावा, या लोकांनी खूप चुकीचं पाऊल उचललं आहे. परत येण्याची संधी त्यांना आपण दिली होती. पण आता वेळ निघून गेली आहे. आता मुंबईत आमचं त्यांना आव्हान असेल," असंही राऊत म्हणाले.



### राजकीय घडामोडींना वेग

## शरद पवारांसह राष्ट्रवादीच्या नेत्यांची मुख्यमंत्र्यांसोबत बैठक

।मुंबई ।महाईन्यूज ।

गेल्या चार दिवसांपासून महाराष्ट्रात राजकीय उलथापालथ सुरू आहे. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे बंडखोरी प्रकरणावरून महाराष्ट्रात राजकीय हालचाली वाढल्या आहेत. एकनाथ शिंदे यांना ४० हून अधिक आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावा शिंदे गटाकडून केला जात आहे. त्यामुळे राज्यातील महाविकास आघाडी सरकार संकटात आहे. याच पार्श्वभूमीवर आज सायंकाळी साडेसहा वाजता राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते प्रफुल्ल पटेल मातोश्रीवर जाऊन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेणार आहेत. याबाबतची माहिती अजित पवारांनी पत्रकार परिषदेत दिली. त्यामुळे महाराष्ट्रात राजकीय घडामोडींना वेग आल्याचं बोललं जात आहे.माध्यमांशी बोलताना त्यांनी म्हटलं की, " आज सायंकाळी साडेसहा वाजता शरद पवार, प्रफुल्ल पटेल आणि मी मातोश्रीवर जाऊन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेणार आहोत. सध्याच्या राजकीय घडामोडीवर मुख्यमंत्र्यांचं मत काय आहे? याबाबत चर्चा केली जाणार आहे. त्यानंतर पुढील भूमिका ठरवली जाईल. आम्ही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी आहोत," असंही ते यावेळी म्हणाले.शिवसेनेच्या ४० बंडोखर आमदारांनी मुख्यमंत्र्यांवर केलेल्या आरोपाबाबत विचारलं असता अजित पवार म्हणाले, "गेली अडीच वर्षे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सगळ्यांना बरोबर घेऊन सरकार चालवलं.

# डावपेच चालतच राहतील पण राज्यकारभार थांबू नये

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे प्रतिपादन

। मुंबई । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी

'राजकारण आणि पाऊस यांची नेहमीच अनिश्चितता असते. राजकारणाचे डावपेच चालतच राहतील.पण त्यामुळे राज्यकारभार थांबला आहे असे मुळीच होता कामा नये. लोकांचे दैनंदिन प्रश्न आणि समस्या सोडविण्याकडे प्रशासनाचे लक्ष असले पाहिजे असे' मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी येथे सांगितले. 'कोरोनाचा प्रसार झपाट्याने वाढू लागला आहे. विशेषतः मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, पालघर या जिल्ह्यात मास्क आवश्यक आहे.काळजी न घेतल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी



स्वयंशिस्तीने कोरोना नियमांचे पालन करणे आवश्यक आहे', असेही ठाकरे म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी आज सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पालिका आयुक्त तसेच मंत्रालयातील विविध विभागांच्या सचिवांच्या दूरदृश्य बैठकीत विविध कामांचा विस्तृत आढावा घेतला. कोरोना, पेरण्या, खतांची उपलब्धता त्याचप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन तयारी, आषाढी वारीतील वारकऱ्यांच्या सुविधा याविषयी महत्वाच्या सूचनाही केल्या. जनतेशी संबंधित महत्वाची कामे थांबवून ठेऊ नका, ती तातडीने माझ्याकडे घेऊन या असेही त्यांनी निर्देश दिले. प्रारंभी मुख्यमंत्र्यांनी राज्यातील वाढत्या कोरोना प्रादुर्भावाचा आढावा घेतला. कोरोनाचा प्रसार झपाट्याने वाढू लागला आहे. विशेषतः मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, पालघर या जिल्ह्यात मास्क आवश्यक आहे. आपल्या घरातील ज्येष्ठांपर्यंत कोरोना पोहचू नये म्हणून अधिकची काळजी घेणे गरजेचे आहे. काळजी न घेतल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी स्वयंशिस्तीने कोरोना नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.संसर्गाचा वेग रोखण्यासाठी लोकल रेल्वे प्रवासात मास्क सक्ती करावी किंवा नाही याबाबत तसेच अन्य कोरोना नियमावली लागू करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली.

राज्यातील कोरोना स्थितीबद्दल आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ प्रदीप व्यास यांनी माहिती दिली. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आता कोरोना रुग्ण आहे. राज्यात साधारणतः २५ हजार रूग्ण आहेत. त्यापैकी ९५ टक्के रुग्ण घरीच उपचार घेत आहेत. पाच टक्के रुग्ण रूग्णालयात उपचार घेत आहेत. रुग्णालयातील संख्या कमी असली तरी दाखल झालेल्या रुग्णांमध्ये ऑक्सीजनवर एक टक्के तर आयसीयूमध्ये अर्धा टक्के रुग्ण आहेत. व्हेंटीलेटरवर आजमितीस २५ रुग्ण आहेत असे सांगून वर्धक मात्रा वाढविण्याची गरज असल्याचे सांगितले. यावेळी नाशिक, पुणे, अमरावती येथील विभागीय आयुक्तांनी देखील कोरोना उपाययोजनांची माहिती दिली.

### आपत्तीत यंत्रणांनी सतर्क राहावे

राज्यातील आपत्ती व्यवस्थापन आणि उपाययोजनांबाबत देखील उद्धव ठाकरे यांनी आढावा घेतला . यावेळी विशेषतः कोकण विभागातील तयारी आणि सज्जता याबाबत कोकण विभागीय आयुक्त यांनी माहिती दिली . दरड प्रवण नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना वेळीच देण्यात याव्यात असेही मुख्यमंत्री म्हणाले. रत्नागिरी, महाड, खेड आणि चिपळूण परिसरांबाबत आतापासूनच विविध यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्याची तसेच अतिवृष्टी आणि आपत्कालीन परिस्थितीत संपर्क यंत्रणा सुरळीत राहावी यासाठी उपाययोजना, सॅटेलाईट- रेडीओ संपर्क यंत्रणा, तसेच मोबाईल चार्जिंगकरिताही व्यवस्था, पाटबंधारे विभागाची पाणी सोडण्याबाबत तसेच आपत्कालीन परिस्थितीत सायरनद्वारे सूचना देण्याची यंत्रणा, वापरण्यात येणाऱ्या बोटींची चाचणी याविषयी माहिती देण्यात आली.

## शॉर्ट न्यूज »

### द्रौपदी मुर्मू यांचा उमेदवारी अर्ज दाखल

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

राष्ट्रपतीपदाची निवडणूक जवळ आली आहे. येत्या १८ जुलै रोजी मतदान होणार असून २१ जुलै रोजी मतमोजणी होणार आहे. एनडीए आणि विरोधी पक्षाकडून राष्ट्रपती पदाच्या उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. भाजपच्या संसदीय मंडळाच्या बैठकीत राष्ट्रपतीपदासाठी द्रौपदी मुर्मू यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. राष्ट्रपती पदाच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांनी आज संसद भवनात उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजपाचे नेते उपस्थित होते.

द्रौपदी मुर्मू यांनी झारखंडच्या माजी राज्यपाल होत्या. आदिवासी समाजातून आलेल्या त्या पहिल्या महिला नेत्या आहेत ज्या भारताच्या सर्वोच्चपदाची निवडणूक लढवत आहेत.

द्रौपदी मुर्मू यांच्या उमेदवारी अर्जातील पहिले प्रस्तावक मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान आहेत. द्रौपदी मुर्मू यांच्या नामांकन पत्रावर स्वाक्षरी करण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी आभार मानत ट्विट केले आहे. मुर्मू यांच्या नामनिर्देशन पत्रावर प्रस्तावक आणि समर्थक म्हणून केंद्रीय मंत्री प्रल्हाद

# राहूल गांधींच्या कार्यालयावर हल्ला

## कार्यालयावर जबरदस्ती कब्ज्याचा काँग्रेसचा आरोप

।मुंबई ।महाईन्यूज । प्रतिनिधी।



काही दिवसांपासून काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांची नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी ईडी कडून चौकशी केली जात आहे. या विरोधात देशात अनेक ठिकाणी आंदोलन सुरू आहे. काँग्रेसचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरून कारवाईचा निषेध करत आहेत. दरम्यान खासदार राहूल गांधी याच्या मतदार संघ वायनाडमध्ये त्यांच्या कार्यालयावर काही जणांनी हल्ला केल्याचे समोर आले आहे. यांच्या कार्यालयाची तोडफोड झाली आहे. या तोडफोडी मागे स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. पक्षाने सांगितले की, हातात झेंडे घेऊन एसएफआयचे कार्यकर्ते कार्यालयाच्या खिडक्यांवर चढले आणि त्यांनी तोडफोड केली.

भारतीय युवक काँग्रेसने एका ट्विटमध्ये काँग्रेस कार्यालयाची तोडफोड केल्याचा आरोप केला आहे. काँग्रेस नेते केसी वेणुगोपाली यांनी सांगितले की, आज दुपारी 3 च्या सुमारास एसएफआय कार्यकर्त्यांच्या आणि नेत्यांच्या एका गटाने वायनाडचे खासदार राहुल गांधी यांच्या कार्यालयावर जबरदस्तीने कब्जा करण्याचा प्रयत्न केला.


### पोलिसांच्या उपस्थितीत प्रकार घडला

पोलिसांच्या उपस्थितीत हा प्रकार घडल्याचा आरोप देखील त्यांनी केला. केरळच्या सीपीएम नेतृत्वाचे स्पष्ट षडयंत्र असल्याचाही आरोप त्यांनी केला आहे. गेल्या 5 दिवसांपासून ईडी त्यांची चौकशी करत आहे, त्यानंतर मला कळत नाही की केरळ सीपीएम नरेंद्र मोदींच्या मार्गावर जात काँग्रेस किंवा राहुल गांधी यांच्यावर हल्ला का करत आहे? तर सीताराम येचुरी आवश्यक ती कारवाई करतील असे मला वाटते, असे काँग्रेस नेते केसी वेणुगोपाल म्हणालेमागणीसाठी दिल्लीतील जंतरमंतरवर सत्याग्रह करण्यात येत आहे.

# पाकव्याप्त काश्मीर चीनच्या ताब्यात?

## कर्जातून सुटका होण्यासाठी पाकिस्तानची खेळी

।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।



चीनकडून घेतलेले कर्ज फेडणे आता आर्थिक संकटात सापडलेल्या पाकिस्तानकडून शक्य होईल असे वाटत नाही. कर्जावरील व्याजाचा हा डोलारा दिवसेंदिवस वाढत असल्याने पाकिस्तान सरकारवरील चीनचा दबावही वाढत चालला आहे. त्यातूनच या कर्जातून सुटका करून घेण्यासाठी आता पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मिरातील गिलगिट-बाल्टिस्तानचा भाग चीनला सुपूर्द करण्याची तयारी सुरू केल्याचे म्हटले जात आहे. तसे झाल्यास भारत-पाक संबंधांत मोठा तणाव निर्माण होऊन युद्ध भडकू शकते.

दक्षिण आशियातील स्थान बळकट करण्याची संधी चीन शोधत आहे. चीन-पाक आर्थिक कॉरिडोर (सीपीईसी) पाकव्याप्त काश्मिरातून जातो. त्यामुळे या भागावर चीनची विशेष नजर आहे. त्यामुळे कर्जाच्या माध्यमातून हा भाग आपल्या ताब्यात यावा यासाठी चीनकडून पाकिस्तानवर दबाव वाढवला जात आहे. याच दबावातून चीनला गिलगिट-बाल्टिस्तानचा भाग मिळाल्यास येथे चीनला अधिकृत सैन्यतळ उभारता येईल. तसे झाल्यास पाकव्याप्त काश्मीर मिळवण्यासाठी भारताला पाकिस्तानसोबतच चीनसोबतही लढावे लागेल.

चीन-पाक आर्थिक कॉरिडोरवर येथील स्थानिक नागरिक नाराज आहेत. हा भाग चीनला सुपूर्द करण्यात आल्यास येथील जनता त्याविरोधात मोठे बंड करण्याची शक्यता आहे. चीनने गिलगिट-बाल्टिस्तान गिळंकृत केल्यास अमेरिकेलादेखील हे परवडणारे नाही. त्यामुळे अमेरिकेकडूनही पाकिस्तानवर दबाव टाकण्याचा प्रयत्न होत आहे.

# गुजरात दंगल : पंतप्रधान नरेंद्र मोदींना क्लिन चीट

## जाफरींची याचिका फेटाळली



।श्रीनगर ।महाईन्यूज ।

२००२ साली गुजरामध्ये जेव्हा दंगल झाली होती तेव्हा नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री होते.२००२ साली झालेल्या गुजरात दंगली प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने पंतप्रधान नरेंद्र मोदींना क्लिन चीट दिली. या अगोदर एसआयटीनेही पंतप्रधान मोंदींसह इतर लोकांना क्लिन चीट दिली होती. याविरोधात काँग्रेसचे माजी खासदार एहसान जाफरी यांच्या पत्नी झाकिया जाफरी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळत पंतप्रधान मोदींना क्लिन चीट दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ए.एम. खानविलकर यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर गेल्या वर्षी ९ डिसेंबर रोजी सुनावणी घेण्यात आली होती. दोन्ही पक्षांचं म्हणणे ऐकूण घेतल्यानंतर न्यायलयाने निकाल राखून ठेवला होता.

# महाराष्ट्राच्या राजकीय युद्धात ममतांची उडी

## पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे शिवसेनेत मोठी फळी निर्माण झाली आहे. ४० पेक्षा जास्त आमदारांच्या पाठिंब्यामुळे महाविकास आघाडी सरकार धोक्यात आले आहे. हे सगळे बंडखोर आमदार सध्या आसामध्ये वास्तव्यास आहेत. महाराष्ट्रात सुरु असलेल्या या राजकीय घमासानात आता पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी उडी घेतली आहे. शिवसेनेच्या बंडखोर आमदारांना पश्चिम बंगालमध्ये पाठवा, आम्ही त्यांचा चांगला पाहुणचार करु, असं म्हणत ममतांनी भाजपाला टोला लगावला आहे.



महाराष्ट्रात राजकीय घमासानात ममतांची उडी

शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाला वेगळेच वळण लागले आहे. सुरुवातीला एकनाथ शिंदे बंडखोर आमदारांसह सूरतला गेले होते. आता शिंदे आपल्या समर्थक आमदारांसह आसाममधील गुवाहाटीमध्ये वास्तव्यास आहे. गुरुवारी तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेचे बंडखोर आमदार थांबलेल्या हॉटेलबाहेर आंदोलन केले होते. महाराष्ट्रात राजकीय घमासान सुरु असताना आता ममता बॅनर्जी यांनी यात उडी घेतली आहे.

शिवसेनेच्या बंडखोर आमदारांनी २४ तासांमध्ये मुंबईत दाखव व्हावे आणि उद्धव ठाकरे यांच्यासमोर उपस्थित राहून चर्चा करावी, असे आवाहन शिवसेना नेते संजय राऊत यांनी केले आहे. त्यानंतर महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याच्या तुमच्या मागणीचा विचार करण्यात येईल असेही राऊत म्हणाले.

### ममतांचा भाजपावर हल्लाबोल

भाजपा असैविधानिक मार्गाने महाविकास आघाडीचे सरकार पाडण्याच प्रयत्न करत असल्याचा आरोप ममता यांनी केला आहे. भाजप आता सत्तेचा दुरुपयोग करून इतर पक्ष फोडत आहे, एक दिवस अन्य कोणी तुमचाही पक्ष फोडेल,' अशी टीका ममता बॅनर्जी यांनी भाजपावर केली. आसाममध्ये सध्या पूरस्थिती आहे तरीही महाराष्ट्रातील आमदारांना तिथे ठेवण्यात आले आहे. भाजपा त्या ठिकाणच्या लोकांचा विचार करत नसल्याचं ममता बॅनर्जी म्हणाल्या. तसेच या मागे भाजपाचाच हात असून बंडखोर आमदारांना भाजपाकडूनच आर्थिक मदत करण्यात येत असल्याचा दावा ममता यांनी केला आहे.

# अनुराग कश्यपच्या ‘दोबारा’चा 23 जून रोजी लंडन फिल्म फेस्टिव्हलमध्ये होणार प्रीमियर!

एकता आर कपूर आणि अनुराग कश्यप यांचा बहुप्रतिक्षित नवीन काळातील थ्रिलर ‘दोबारा’ 19 ऑगस्ट 2022 ला प्रदर्शित होत आहे. यात आणखी रोमहर्षकता आणत, तापसी पन्नू अभिनित लंडन फिल्म फेस्टिव्हलमध्ये प्रीमियर होणार आहे. दिग्दर्शक-अभिनेता जोडी 23 जून, संध्याकाळी 6 वाजता #LIFF2022 ओपनिंग नाईट गालामध्ये चित्रपट सादर करणार आहेत. पुरस्कार विजेती अभिनेत्री तापसी पन्नू अभिनित या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसिद्ध दिग्दर्शक अनुराग कश्यप यांनी केले



आहे आणि शोभा कपूर आणि एकता आर कपूर (कल्ट मूव्हीज, बालाजी टेलिफिल्म्स अंतर्गत नवीन शाखा) आणि सुनीर खेतरपाल आणि गौरव बोस (एथेना) यांनी याची निर्मिती केली आहे. दोबारा हा नव्या जमान्यातील थ्रिलरपट असून यामध्ये तापसी आणि अनुराग तिसऱ्यांदा एकत्र येत आहेत. दोबारासोबत, तापसी आणि पावेल गुलाटी यांची हिट जोडी थप्पडच्या जबरदस्त यशानंतर पुन्हा एकत्र दिसणार आहे.दोबारा, बालाजी मोशन पिक्चर्स, कल्ट मूव्हीजच्या नवीन विभागातील पहिला चित्रपट असून, आकर्षक, वेगवान आणि शैलीदार कथा सांगतो.

# आपल्या दमदार अभिनयाने छोट्या पडद्यावर अधिराज्य गाजवतेय सुमोना चक्रवर्ती

‘द कपिल शर्मा शो’ हा रिलॅलिटी शो प्रेक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध आहे. गेली अनेक वर्षे या शो ने प्रेक्षकांचं भरभरून मनोरंजन केलं आहे. या शो ची प्रसिद्धी केवळ भारतातच नाही तर जगभरात आहे. या शो मध्ये काम करणाऱ्या कलाकारांनाही खूप प्रसिद्धी मिळाली. या शो मध्ये भुरी ही व्यक्तिरेखा साकारणारी अभिनेत्री सुमोना चक्रवर्ती हीने तिच्या अभिनयाने आणि कॉमेडीच्या खास अंदाजाने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. सुमोना चक्रवर्ती आज २४ जून रोजी तिचा वाढदिवस साजरा करते आहे. अभिनेत्री सुमोना चक्रवर्ती ही गेली अनेक वर्षे विविध कार्यक्रम आणि मालिकांमधून काम करत प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. कपिल शर्मा या शो मध्ये भुरीची भूमिका साकारणारी अभिनेत्री सुमोना चक्रवर्तीचा आज वाढदिवस आहे. सुमोना तिचा ३४ वा वाढदिवस साजरा करत आहे. सुमोनाने वयाच्या ११ व्या वर्षी सिने सृष्टीमध्ये पदार्पण करत तिच्या अभिनयाच्या कारकिर्दीला सुरुवात केली. सुमोना चक्रवर्ती गेल्या अनेक वर्षांपासून ‘द कपिल शर्मा शो’ चा एक भाग आहे. या शो मध्ये येण्यापूर्वी सुमोनाने अनेक मालिका आणि रिऍलिटी शो मधून आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली आहे. त्याचप्रमाणे १९९९ मध्ये अभिनेता आमिर खान आणि अभिनेत्री मनीषा कोईराला यांच्या ‘मन' या चित्रपटातून अभिनेत्री सुमोना चक्रवर्तीने आपल्या अभिनय कारकिर्दीच्या प्रवासाला सुरुवात केली होती. या चित्रपटात सुमोनाने नेहा नावाच्या एका शालेय विद्यार्थीनीची भूमिका साकारली होती. पण या चित्रपटात काम केल्यानंतर मात्र सुमोना चक्रवर्ती छोट्या पडद्याकडे म्हणजेच मालिकांकडे वळली. सुमोनाने अनेक मालिकांमधून विविध भूमिका साकारल्या आहेत. पण सुमोनाला खरी ओळख मिळाली ती ‘बडे अच्छे लागते है या मालिकेमुळे. या मालिकेत सुमोनाने नताशा कपूर ही व्यक्तिरेखा साकारली होती.



# हेमांगी विचारतेय ‘आता कुणाला खरा वाघ म्हणायचं

"बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांनाच बाई" असं एका युजरने म्हटले आहे. तर दुसरा एकजण म्हणाला की, "अशा कॉमेंट वरुन केतकी चितळे व्हाल"

सध्या संपूर्ण भारताचे लक्ष महाराष्ट्राच्या राजकारणातील घडामोडींकडे लागून राहिलेले आहे. शिवसेना नेचे एकनाथ शिंदे यांच्या बंडखोरीमुळे मागील तीन दिवसांमध्ये महाविकास आघाडी सरकार कोसळण्याची भीती निर्माण झाली आहे. दरम्यान या परिस्थितीबाबत राजकीय क्षेत्रासोबतच सिनेसृष्टीतील कलाकारही आपलं मत व्यक्त



करत आहेत. त्यात सुमित राघवन, किरण माने, हेमंत ढोमे यांच्यासारख्या बऱ्याच कलाकारांनी आपले मत व्यक्त केले.

अशातच यासंदर्भात आता मराठमोळी अभिनेत्री हेमांगी कवीने सुद्धा सोशल मीडियाद्वारे एक पोस्ट शेअर केली आहे. हेमांगी कवीने याआधी सुद्धा अनेकदा राजकीय घडामोंडींवरून आपले मत व्यक्त केलेले आहे. या वेळी सुद्धा हेमांगी कवीने आपले मत व्यक्त केले आहे. त्यात तिने म्हटलंय की, ‘आता कुणाला खरा वाघ म्हणायचं?’, असं हेमांगीने

# ठरलं! अंजलीबाई आणि राणादा यांचा विवाह सोहळा

या दोघांचे अचानक साखरपुडा झालेले फोटो पाहून सोशल मीडियावर अनेकांना आश्चर्याचा मोठा धक्का बसला होता. आता मात्र त्या दोघांच्या चाहत्यांना या दोघांचे लग्न कधी होणार याकडे लक्ष लागून राहिले आहे



नुकत्याच काही दिवसांपूर्वी ‘तुझ्यात जीव रंगला’ या लोकप्रिय मालिकेतील मुख्य कलाकार आणि प्रेक्षकांची लाडकी जोडी अंजली बाई आणि राणा दा आता खऱ्या आयुष्यातील पती-पत्नी होणार असल्याची बातमी समोर आली होती. काही दिवसांपूर्वी त्यांचा साखरपुडा पार पडला मोठ्या थाटामाटात पार पडला होता. या दोघांचे अचानक साखरपुडा झालेले फोटो पाहून सोशल मीडियावर अनेकांना आश्चर्याचा मोठा धक्का बसला होता. आता मात्र त्या दोघांच्या चाहत्यांना या दोघांचे लग्न कधी होणार याकडे लक्ष लागून राहिले आहे. आता नुकत्याच एका मुलाखतीत हार्दिकने याबाबत उत्तर दिले आहे.

अक्षया आणि हार्दिकच्या घरी आता त्यांच्या लग्नाची तयारी सुरू झाली आहे. दरम्यान साखरपुड्यानंतर काही दिवसांनी अक्षया आणि हार्दिक ‘चला हवा येऊ द्या’ या कार्यक्रमामध्ये आले होते. त्यावेळी त्यांच्यासह शिवानी आणि विराजस सुद्धा कार्यक्रमात आले होते. या शोमध्ये अक्षया आणि हार्दिकला “लग्न कुठे करणार?” असा प्रश्न विचारण्यात आला होता.

# प्राजक्ता माळीने शेअर केला मुक्ता बर्वेसोबत काम करण्याचा अनुभव, म्हणाली “तुझ्याबरोबर...”


मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळी सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असते. सध्या प्राजक्ताकडे बरेच प्रोजेक्ट असून सातत्यानं ती सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांना याचे अपडेट देत असते. अलिकडेच प्रदिर्शित झालेली ‘रानबाजार’ ही तिची वेब सीरिज बरीच



गाजली होती. त्यानंतर आता लवकरच ती ‘वाय’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात प्राजक्तासोबत अभिनेत्री मुक्ता बर्वे मुख्य भूमिकेत दिसणार आहे. सध्या या चित्रपटाची सोशल मीडियावर बरीच चर्चा असतानाच प्राजक्तानं मुक्तासोबत काम करण्याचा अनुभव चाहत्यांसोबत शेअर केला आहे.

## शॉर्ट न्यूज »

### राष्ट्रकुल स्पर्धेसाठी महिला हॉकी संघाची घोषणा



नवीदिल्ली । महाईन्यूज

आगामी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी १८ सदस्यीय भारतीय महिला हॉकी संघाची घोषणा गुरुवारी करण्यात आली. पूर्णपणे तंदुरुस्त नसल्याने भारताची तारांकित आघाडीपटू राणी रामपालला या संघातही स्थान देण्यात आले नाही. भारतीय संघाचे नेतृत्व गोलरक्षक सविता पुनिया करणार आहे, तर बचावपटू दिप ग्रेस एक्का उपकर्णधाराच्या भूमिकेत असेल. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे आयोजन २८ जुलै ते ८ ऑगस्ट दरम्यान होणार आहे. या दोन्ही खेळाडू नेदरलँड्स आणि स्पेन यांच्या संयुक्त यजमानपदाखाली १ ते १७ जुलैदरम्यान होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेत सारख्याच जबाबदाऱ्या पार पाडतील. गोलरक्षक : सविता (कर्णधार), रजनी एतिमार्पु; बचावपटू : दिप ग्रेस एक्का (उपकर्णधार), गुरजित कौर, निक्की प्रधान, उदिता; मध्यरक्षक : निशा, सुशीला चानू पुखरम्बाम, मोनिका, नेहा, ज्योती, नवजोत कौर, सलिमा टेटे; आघाडीपटू : वंदना कटारिया, लालरेम्सियामी, नवनीत कौर, शर्मिला देवी, संगीता कुमारी.

# फलंदाज कसा बाद झाला हे गोलंदाजालादेखील समजले नाही

## न्यूझीलंड विरुद्ध इंग्लंड कसोटी सामन्यातील गोंधळ

। नवीदिल्ली । महाईन्यूज ।



सध्या भारताप्रमाणे न्यूझीलंडचा संघदेखील इंग्लंड दौऱ्यावर आहे. दोन्ही देशांदरम्यान तीन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील शेवटचा कसोटी सामना लीड्समध्ये सुरू आहे. या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी पाहुणा फलंदाज हेन्री निकोल्स अतिशय विचित्र पद्धतीने बाद झाला. तो बाद झाल्यानंतर गोलंदाज जॅक लीचच सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला.

५६व्या षटकात हेन्री निकोल्स १९ धावांवर बाद झाला. त्याच्या रुपात न्यूझीलंडने आपला पाचवा गडी गमावला. मात्र, निकोल्स कसा बाद झाला हे काही क्षण कुणाच्याही लक्षात आले नाही. गोलंदाज जॅक लीचच्या गोलंदाजीवर निकोल्सने सरळ फटका खेळला. तो चेंडू नॉन-स्ट्राइकिंग फलंदाज डेरेल मिशेलच्या बॅटला लागला आणि मिड-ऑफला उभ्या असलेल्या ॲलेक्स लीसच्या हातात गेला.

निकोल्स विचित्र पद्धतीने बाद झाला असली तरी त्याचा बळी नियमांना धरूनच आहे. क्रिकेटचे नियम तयार करणाऱ्या मेरीलबोन क्रिकेट क्लबने (एमसीसी) ट्विट करून याबाबत सविस्तर माहिती दिली आहे. "हा दुर्दैवी बळी असला तरी पूर्णपणे नियमांनाधरून आहे. नियम ३३.२.२.३ नुसार, जर यष्ट्या, पंच, इतर कोणताही क्षेत्ररक्षक, धावपटू किंवा फलंदाज यांना स्पर्शून गेलेला चेंडू क्षेत्ररक्षकाने पकडला तर तो फलंदाज बाद असतो.

त्यापूर्वी, न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाहुण्या संघाची सुरुवात चांगली झाली नाही. पहिल्याच षटकात स्टुअर्ट ब्रॉडने टॉम लॅथमला बाद केले. यानंतर विल यंग २० धावा करून बाद झाला. कर्णधार केन विल्यमसनने कोविड-१९ मधून बरा झाल्यानंतर पुनरागमन केले. परंतु, तो केवळ ३१ धावा करू शकला. डेव्हॉन कॉनवे २६ धावा करून बाद झाला. या दरम्यान डेरेल मिशेलने आपले अर्धशतक पूर्ण केले.

# "ते नसते तर मी कधीच..."

## सर्फराज खानने नौशाद खान यांना दिले दिले यशाचे श्रेय

। पीटीआय । महाईन्यूज ।



बंगळुरूमधील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर रणजी करंडक स्पर्धेचा अंतिम सामना खेळवला जात आहे. देशांतर्गं क्रिकेटमधील सर्वात प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या या अंतिम सामन्यात मुंबई आणि मध्य प्रदेश एकमेकांशी दोन हात करत आहेत. सामन्याच्या दुसऱ्या दिवशी मुंबईचा धडाकेबाज फलंदाज सर्फराज खानने या हंगामातील चौथे शतक पूर्ण केले आहे. अंतिम सामन्यात शतक साजरे केल्यानंतर सर्फराजने अनोख्या अंदाजात आनंद साजरा केला. आपल्या यशाचे सर्व श्रेय त्याने वडील आणि प्रशिक्षक असलेल्या नौशाद खान यांना दिले आहे.

नौशाद खान यांची दोन्ही मुले सर्फराज आणि मुशीर मुंबईच्या संघाकडून क्रिकेट खेळतात. त्यापैकी सर्फराज सध्या रणजी स्पर्धेमध्ये जबरदस्त कामगिरी करत आहे. अंतिम सामन्यातील दुसऱ्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर पत्रकारांनी सर्फराज खानशी संवाद साधला.

'भारतीय संघात स्थान मिळवण्याचे स्वप्न पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे का?', असा प्रश्न सर्फराजला विचारण्यात आला. या प्रश्नाला उत्तर देताना त्याचे डोळे पाणावले. शतक पूर्ण केल्यानंतरही मैदानात सर्फराज भावूक झाला होता. 'वडिलांच्या अथक परिश्रमांमुळे मी आज या ठिकाणी पोहचलो आहे,' असे तो म्हणाला. नौशाद खान हेच आपल्या दोन्ही मुलांना प्रशिक्षण देतात आणि त्यांचा सरावही घेतात. जेव्हा कोणताही सामना नसतो तेव्हा दोन्ही भाऊ वडिलांच्या देखरेखीखाली दररोज सहा ते सात तास सराव करतात. काही अंतर्गत प्रशासकीय मुद्द्यांमुळे सर्फराजला एका हंगामासाठी उत्तर प्रदेशला जावे लागले होते.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही